# महिला सबळीकरणासाठी

## जपानी लाव्ही पक्षी पालन एक यशस्वी उद्योग

**डॉ.धुमाळ माणिक, डॉ.एम.जी. निकम आणि डॉ. के. के. खोसे**

महिलांचे छोटे छोटे बचत गट हेच महिलांचा सबळी करणाचा यशस्वी मार्ग आहे. बचत गटामुळे महिलांना स्वतःविषयीचा विश्वास, काम करण्याची शक्ती, निर्णय क्षमता व त्याचबरोबर थोडीशी बचत करून स्वतःचे भांडवल उभा करण्यासाठी पाया रचणे आणि महिलांविषयी सामाजिक एकत्रिकरणाची भावना इ. गुण अंगीकारले जातात.

या बचत गटांना स्वंयरोजगाराची चांगली जोड लागल्यास उत्पन्नाचा मार्ग म्हणून महिलांची आर्थिक उन्नती होउन महिला सबळीकरणचा नवीन मार्ग उपलब्ध होतो असे शेतीस पुरक असलेले बरेच लघु उद्योग बचत गटा तर्फे राबवून आर्थिक उन्नती साधता येते.

अशा उद्योगांमध्ये महिला सबळीकरणासाठी लाव्ही पक्षी पालन एक यशस्वी उद्योग उदयास येत आहे. कुकुटपालन विभाग, पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी येथे महिला बचत गटाच्या सबळीकरणासाठी लाव्ही पक्षी पालन हा प्रकल्प परभणी जिल्हयात जैवतंत्रज्ञान विभाग, विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली कडून राबवण्यात येत आहे.

जपानी लाव्ही पक्ष्यांच्या उद्योगांसाठी जागा, भांडवल, साहित्य, कालावधी फारच कमी लागतो. जपानी लाव्ही पक्ष्यांची वैशिष्टे म्हणजे रंग तपकिरी असतो. वजन साधारणतः 180—200 ग्रॅम असते. एक पक्षी एकावर्षात 280—300 अंडी देतो. अंडयाचे वजन 10—12 ग्रॅम असते. अंडयाचा रंग तपकिरी असुन त्यावर काळे पांढरे आणि इतर रंगाचे ठिपके असतात. अंडयामध्ये व मांसामध्ये प्रथिनाचे प्रमाण जास्त असुन कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी असते. लाव्ही पक्ष्यांचे मांस कोंबडीच्या मांसापेक्षा चविष्ठ असते. लाव्ही पक्ष्यांच्या अंडयाची पोष्टीकता कोंबडीच्या अंडयापेक्षा जास्त असते.

भारतात जपानी लाव्ही पालन हा एक 'लघु कुक्कुटपालन उद्योग' म्हणून प्रसिध्दी पावत आहे. 180—200 ग्रॅम वजनाचा पक्षी 30—35 रूपयाला विकत मिळतो तसेच साधारणतः 50—60 पैश्यास एक या दराने लाव्ही पक्ष्यांची अंडी उपलब्ध आहेत. विभक्त कुटूंब पध्दतीमुळे छोटया कुटूंबाच्या गरजेनुसार लहान आकाराचे पक्षी आणि अंडी यांना मागणी वाढत आहे. लाव्ही पक्षी साधारणतः सहा आठवडयानंतर अंडी देण्यास सुरू करतो. तसेच मांसासाठी सुध्दा 6 आठवडयांमध्ये पक्षी विक्रीसाठी तयार होतात लाव्ही पक्षीमध्ये वेगवेगळया रोगाविरूध्द प्रतिकारक्षमता जास्त असते. म्हणून ते रोगास सहज बळी पडत नाहीत. कुक्कुटपालन विभाग, पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी येथे जपानी लाव्ही पक्षी पालना संबंधी नवीन तंत्रज्ञान विकसित केलेले आहे. यामध्ये उपलब्ध असलेल्या साहित्यांमधुन कमी किंमतीचे लाकडी पिंजरे विकसीत करण्यात आलेले आहेत. सदरील पिंजरे 4 फुट रूंद X 8 फुट लांब X 2 फुट उंच या आकारमानाचे असुन वरील बाजुस दार ठेवण्यात आलेले आहे. (आकृती) सदरील पिंजऱ्यात साधारणतः 80—100 जपानी लाव्ही पक्षी अल्हादायकपणे राहू शकतात. पक्ष्यांचे हे पिंजरे वजनाने हलके असल्यामुळे स्थलांतरासाठी सोयीस्कर आहेत. तसेच पक्ष्यांची जागा बदल्यामुळे रोग प्रादुर्भाव टाळता येतो.

**जपानी लाव्ही पक्ष्याचे व्यवस्थापन : उबवणुक व पिल्लाची काळजी.** लाव्ही पक्ष्यांची अंडी छोटी असतात. त्यांचा उबवणुकीचा काळ साधारणतः 17—18 दिवस असतो. व्यवसायिक लाव्ही पालनासाठी कृत्रीम उबवणुक फायदेशीर ठरते. यासाठी छोटी उबवणुक यंत्रे बाजारपेठेत उपलब्ध झाली आहेत. (500—1000 अंडी उबवणुक क्षमता). इन्व्हर्टरवर चालणारी अंडी उबवणुक यंत्रे देखील बाजारात उपलब्ध आहेत.

उबवणूक यंत्रामधुन निघालेली लाव्ही पक्ष्यांची पिल्ले 6—8 ग्रॅम वजनाची असतात. त्यांच्यासाठी पहिला आठवडा अतिशय महत्वाचा असतो. सुरूवातीला 2 आठवडे कृत्रीम उब देणे आवश्यक असते. यासाठी कोंबडयांच्या पिल्लांना वापरली जाणारी ब्रुडर्स वापरता येतात. उब देण्यासाठी विद्युत किंवा गॅस ब्रुडर्स यांचा वापर करता येतो. वारंवार विद्युत पुरवठा खंडीत होत असल्याने गॅस बुंडर्सचा उपयोग करता येतो. पहिल्या आठवडयात साधारणतः 33.5$^0$C तापमान आवश्यक असते. त्यानंतर प्रत्येकी चार दिवसास 2.5 $^0$C ने तापमान कमी करावे जेणे करून 15 दिवसामध्ये ब्रुडर्सचे तापमान आणि सभोवतालचे वातावरणातील तापमान सारखे असेल. तापमान कमी किंवा जास्त ओळखण्यासाठी पिल्लांच्या हालचालीवर निरिक्षण ठेवावे. नवजात पिल्लामध्ये पहिल्या 2—3 दिवसामध्ये 10—15 टक्के मर होउ शकते. हेटाळण्यासाठी आवश्यक बाबीचा कौशल्याचा वापर केल्यास मर कमी होते. पिल्ल नाजूक व छोटी असल्यामुळे बऱ्याच वेळेस ते पाण्याच्या भांडयामध्ये पडून मरतात हे टाळण्यासाठी पाण्याच्या भांडयात छोटे छोटे फरशीचे तुकडे किंवा खडे टाकावेत. त्यामुळे पिल्लांना आधार मिळतो. लाव्ही पक्ष्यांची पिल्ले नाजुक परंतु अतिशय चपळ असतात.

कृत्रीम ऊब देण्यासाठी ब्रुडर्सच्या खाली ठेवलेली पिल्ले उडण्याचा प्रयत्न करतात, धावतात त्यामुळे त्यांना इजा होण्याची शक्यता असते आणि मरण्याचे प्रमाण वाढते. हे सर्व टाळण्यासाठी रिकामे पोते अंथरून त्यावर त्यांची जोपासना करावी.

**लाव्ही पक्ष्यांचे खाद्य व्यवस्थापन**

मांसल लाव्ही पक्ष्यांसाठी स्टार्टर खाद्य पहिले 3 आठवडे देणे गरजेचे असते. त्यानंतर चौथ्या आडवडया पासुन फिनिशर खाद्य द्यावे. अंडीदेणाऱ्या लाव्ही पक्ष्यांच्या बाबतीत अंडी उत्पादनाला सुरूवात (6–7 आठवडे) झाल्यानंतर लेअर मॅश द्यावे. सुरूवातीस मांसल लाव्ही पक्ष्यांसाठी 27 टक्के प्रथिने असलेले खाद्य देणे आवश्यक आहे त्यानंतरच्या काळात प्रथिनांचे प्रमाण क्रमाक्रमाने कमी करत जाऊन 22 टक्के प्रथिने ठेवणे आवश्यक आहे. तसेच अंडयावरील लाव्ही पक्ष्यांना 20 टक्के प्रथिने व 3 टक्के कॅलशिअम असलेले खाद्य हितावह आहे.

**बाजारपेठ**

लाव्ही पक्षी पालन हा एक नवीन व्यवसाय आहे. अंडी व मांस पोशक मूल्याविषयी अदयाप जनजागृती होणे आवश्यक आहे. बऱ्याचवेळेस आहारात लाव्ही पक्ष्यांची अंडी व मांस वापरण्याविषयी संदीग्धता असते. जनजागृती नसल्यामुळे विक्रीसाठी अडचणी येतात. 'कृषी महोत्सव 2010 परभणी येथे लाव्ही पक्षी व त्यांची अंडी ठेवण्यात आली होती. सरूवातीला लाव्ही पक्ष्यांच्या अंडयाचा रंग तपकीरी व वेगवेगळे ठिपके असल्यामुळे ग्राहक पसंत करत नव्हता, परंतु जेव्हा हीच अंडी उकडून खाण्यासाठी ठेवली तेंव्हा ग्राहकाने अंडी अतिशय चविष्ट आणि उत्तम प्रतिची असल्याचे सांगितले. तसेच कांही ग्रामिण भागात प्रायोगीक तत्वावर कुक्कुटपालन विभाग, पशूवैद्यकीय महाविद्यालय, परभणी तर्फे कांही महिला बचत गटांना लाव्ही पक्ष्यांचे वितरण करण्यात आले. त्यावेळी असे आढळले की तेथील लोकांनी लाव्ही पक्षाच्या अंडयाची व मांसाची पौष्टीकता व चव पाहून मोठया प्रमाणावर मागणी केल्याचे निदर्शनास आले.

अशा प्रकारे जनजागृती केल्यास अंडयासाठी व मांसासाठी मोठया प्रमाणावर बाजारपेठ उपलब्ध होईल. महिला बचत गटाचे लाव्ही पक्षी पालन उद्योगामुळे आर्थिक उत्पन्न वाढून जीवनमान उंचावण्यासाठी मदत होईल.

**मांसल लाव्ही पक्ष्यांचे अर्थशास्त्र**

| | | |
|---|---|---|
| 1. | लाव्ही पक्ष्यांच्या प्रति पिल्लाची किंमत | रू. 7/– |
| 2. | 6–7 आठवडयापर्यंत लागणाऱ्या खाद्याची किंमत | रू. 11/– |
| 3. | इतर खर्च | रू. 3– |
| | एका पक्ष्यासाठी लागणारा एकूण खर्च | रू 21– |
| | एका पक्ष्याची बाजारातील विक्री किंमत | रू 30/– |
| | प्रति पक्षी नफा | रू 9/– |

लाव्ही पक्ष्यांच्या गट संख्येनुसार नफयाचे प्रमाण वाढत जाते. साधारणतः 200 पक्ष्यांच्या गटामागे रू 1800–2000/– निव्वळ नफा दिड महिन्यात मिळू शकतो.

सदरील पक्षी सहा आठवडयानंतर अंडयासाठी ठेवल्यास साधारणतः 280–300 अंडी मिळतात व अंडी विक्रीतुन अंदाजे रू 40–45 प्रति पक्षी प्रति वर्ष प्रमाणे नफा मिळतो.

ग्रामीण भागात सहज परवडेल अशा किमतीमध्ये एक चांगल्या दर्जाच्या प्रथिनाचा स्त्रोत म्हणुन लाव्ही पक्ष्यांकडे पाहिले जाईल आणि हा व्यवसाय ग्रामीण भागात विशेषतः लहान मुले, गर्भवती महिला यांच्या आहारातील प्रथिने कमतरतेचा प्रश्न सोडवू शकेल. लाव्ही पक्षी पालनाच्या माध्यमातुन महिला सबळीकरणासाठी एक उत्तम संधी चालून आलेली आहे.

**प्रशिक्षण आणि मार्गदर्शन**

लाव्ही पक्षी पालन संबंधी प्रशिक्षण आणि मार्गदर्शन कुक्कुटपालन विभाग, पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी येथे देण्यात येत आहे.

**संपर्कासाठी पत्ता**

1. डॉ. माणिक धुमाळ
सहयोगी प्राध्यापक
कुक्कुटपालन विभाग,
पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी
मो. न. 9422176705



लाव्ही पक्ष्यांची महिला बचत गटासाठी प्रशिक्षण




लाव्ही पक्ष्यांची महिला बचत गटासाठी प्रशिक्षण



महिला सबळीकरणासाठी लाव्ही पक्ष्यांच्या गटाची स्थापना



लाव्ही पक्ष्यांच्या गटाची पाहणी करत असतांना महिला





महिला सबळीकरणासाठी लाव्ही पक्षी पालन प्रशिक्षण - प.वै.म. परभणी



महिला सबळीकरणासाठी लाव्ही पक्षी पालन प्रशिक्षण - प.वै.म. परभणी



लाव्ही पक्ष्यांच्या अडंयाची चव घेताना महिला - प.वै.म. परभणी



लाव्ही पक्षी पालन - कमी खर्चात लाकडी पिंजरा तयार करणे



लाव्ही पक्षांची अंडी



लाव्ही पक्षांची अंडी आणि पक्षी




अंडी उबवणुक यंत्र



लाव्ही पक्षांची पिलं (जन्मतः)